# निशाणी १८४ वरील आदेश

**(सहदेव राणे व. वि.साउथ कोकण डिस्ट्रीलरीज व.)**

**CNR.No.MHSI06-000001-1994**

**१.** प्रस्तुतचा अर्ज वादीतर्फे दाखल करणेत आलेला आहे. वादीच्या मते, वादीने प्रतिवादी क्र. ५ हे मयत झालेबाबतची माहिती निशाणी क्र. १८२ लगत दाखल असणाऱ्या पुरशिसद्वारे कळविणेत आलेली आहे. प्रस्तुत कामी सदरचा दावा प्रतिवादी क्र. ५ यांचेविरुध्द एकतर्फा चालविणेबाबत यापूर्वी आदेश पारीत करणेत आलेला आहे. प्रतिवादी क्र. ५ यांनी दाव्याचे कामी हजर होवून कैफियत दाखल केलेली नाही व वादीचा दावा देखील नाकारलेला नाही, असे कथन करुन प्रस्तुस अर्जाद्वारे वादीस मयत प्रतिवादी क्र. ५ चे वारस दाखल न करणेची मुभा देणेबाबत विनंती करणेत आलेली आहे.

**२.** प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र. १ व ३ यांचेवतीने म्हणणे दाखल करणेत आलेले आहे. प्रस्तुतचा दावा हा अन्य प्रतिवादींविरुध्द एकतर्फा चालविणेबाबत आदेश पारीत करणेत आलेला आहे. प्रतिवादी क्र. १ व ३ यांनी मयत प्रतिवादीचे कायदेशीर प्रतिनिधी दाव्याचे कामी समाविष्ट करणे आवश्यक आहे अशा आशयाचे म्हणणे सादर करुन वादीचा अर्ज नामंजूर करणेबाबत विनंती करणेत आलेली आहे.

**३.** वादी व प्रतिवादीतर्फे करणेत आलेला युक्तीवाद व प्रस्तुत प्रकरणातील दावा अर्ज यांचे अवलोकन केले असता, सदरचा दावा हा वादीने प्रतिवादीविरुध्द निरंतर ताकीद दाद, आज्ञार्थी ताकीद दाद तसेच दावा जमिनीचा कब्जा दरम्यानचे उत्पन्नासह मिळणेबाबत दाखल केलेला आहे. प्रस्तुतकामी माझे पूर्वाधिकारी यांनी दि. १८/१०/१९९५ रोजी प्रतिवादी क्र. ५ यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत केलेला दिसून येत आहे. तथापि, वादी हे दाखल केलेल्या दाव्याचे कामी सर्व प्रतिवादींविरुध्द दाद मागीत असलेचे दिसून येत आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रतिवादी क्र. ५ यांचेविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करणेत आलेला आहे या कारणास्तव, त्यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर नोंद न घेणेबाबतचा आदेश करणे म्हणजे प्रतिवादी क्र. ५ यांचे कायदेशीर वारसांना वादीचे दावेस बचाव सादर करणेची संधी न देता त्यांचेविरुध्द आदेश पारीत केले जाण्याजोगे आहे.

**४.** दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम २२ नियम ४ (४) या न्यायालयास योग्य वाटेलस अशा प्रकारची संधी देणेची मुभा देणेत आलेली आहे. तथापि, प्रस्तुतकामी वादी हे प्रतिवादीविरुध्द आज्ञार्थी ताकीद दाद मागून दावा मिळकतीमधील बांधकाम व तारेचे कुंपण टाकणेकरिता आदेश होणेबाबत तसेच दावा जमिनीचा कब्जा दरम्यानचे उत्पन्नासह वादींना देणेचा आदेश होणेबाबत विनंती करीत आहेत. अशा परिस्थितीमध्ये वादातीत मिळकती अनुषंगे हक्क संबंध असणारे सर्व लोक हे 'आवश्यक पक्षकार' या संज्ञेत अंतर्भूत होतात. दाव्याचे कामी आवश्यक असणाऱ्या पक्षकारांना दाव्यात सामील न करता पारीत करणेत आलेला हुकुमनामा हा दोन्ही पक्षातील वाद कायमस्वरुपी संपुष्टात आणू शकत नाही. याउलट, दोन्ही पक्षादरम्यान अन्य स्वरुपाचे न्यायालयीन प्रकरणे उद्भविण्याची शक्यता नाकारता येत नाही. वादी व मयत प्रतिवादी क्र. ५ यांचे कायदेशीर प्रतिनिधी यांचे दरम्यान दावा मिळकती अनुषंगे अस्तित्वात असणारे वाद एकाचवेळी गुण दोषावर निर्णयीत होणेकरिता मयत प्रतिवादी क्र. ५ यांचे कायदेशीर प्रतिनिधी अभिलेखावर नोंद होणे जरुरीचे आहे. सबब, न्यायाचे कारणास्तव मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

अर्ज खर्चासह नामंजूर करणेत येतो.

Digitally signed by DURGA BHAGAWAN SUTAR
Date: 2022.04.30 11:23:40 +0530

( डी.बी.सुतार )

दिनांकः–२९/०४/२०२२.

सहदिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
सावंतवाडी.